आधुनिक शहरातील घडामोडी

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

e Paper

वर्ष 4 थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 28/04/2026 METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 111 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com

# नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्या-माधुरी मिसाळ

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी चिंचवड शहराच्या विकासकामांमध्ये गुणवत्ता आणि पारदर्शकता राखणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सर्व प्रकल्प वेळेत पूर्ण करुन नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करुन द्याव्यात तसेच महानगरपालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी विविध विभागांमध्ये समन्वय ठेवून शहरातील विकास कामांचा वेग वाढविण्याचे आणि प्रलंबित कामे प्राधान्याने पूर्ण करण्याचे निर्देश राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात राज्याच्या नगरविकास, परिवहन, सामाजिक न्याय, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ विभागाच्या राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी शहरातील विविध महत्त्वाच्या विकासकामांची आढावा बैठक घेतली. यावेळी राज्यमंत्री मिसाळ बोलत होत्या.

बैठकीच्या प्रारंभी महापौर रवि लांडगे यांनी नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे स्वागत केले, यावेळी विधान परिषद सदस्य उमा खापरे,अमित गोरखे, आमदार महेश लांडगे, शंकर जगताप, उपमहापौर शर्मिला बाबर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, शहर सुधार समितीचे सभापती संजय काटे, नगर सदस्य कुणाल वाव्हळकर, धर्मराज तंतरपाळे आदी उपस्थित होते.

तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, उपसंचालक नगररचना किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, स्मार्ट सिटीचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव, सह शहर अभियंता बापू गायकवाड, सुनिल भगवानी, प्रेरणा सिनकर, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, सचिन पवार, अण्णा बोदडे, संदीप खोत, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीच्या सुरुवातीस आयुक्त डा.ॅविजय सूर्यवंशी यांनी संगणकीय सादरीकरणातून शहरात सुरु असलेले पाणी पुरवठा प्रकल्प, अमृत योजना 2. 0, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प, शहरातील ड्रेनेज व पायाभूत सुविधा सुधार प्रकल्प, मेट्रो वाहतूक प्रकल्प, रस्ते विकास प्रकल्प प्रधानमंत्री आवास योजना, हुतात्मा क्रांतिवीर चापेकर वाडा, अग्निशमन केंद्र, नोकरदार महिला वसतिगृह, संतपीठ प्रकल्प, मनोरंजन प्रकल्प, नदी सुधार प्रकल्प, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता तसेच विविध नागरी प्रकल्पाची माहिती राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना दिली.

# महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे स्मारक उभारु - अण्णा बनसोडे

## माता रमाई स्मारकाच्या भूमिपूजनाच्या पार्श्वभूमीवर पाहणी व आढावा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्प शहरातील आंबेडकरी जनतेच्या तब्बल 22 वर्षांच्या संघर्षलढ्याचे यश आहे. हा आनंदाचा क्षण असून**

**महाराष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण भारताला हेवा वाटेल असे रमाई स्मारक उभारु, असे प्रतिपादन राज्याच्या विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनी केले. रमाई भीमराव आंबेडकर सृष्टी प्रकल्पाचे भूमिपूजन उद्या 28 एप्रिलला होत आहे, या पार्श्वभूमीवर बनसोडे यांनी या स्मारकस्थळाची पाहणी करून कामाचा सविस्तर आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते.**



यावेळी अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, सह शहर अभियंता मनोज सेठीया, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता विजय जाधव यांच्यासह अधिकारी कर्मचारी आणि नागरिक उपस्थित होते.

यावेळी बनसोडे म्हणाले, "त्यागमूर्ती माता रमाई स्मारक ही केवळ एक स्मारक नसून, आंबेडकरी चळवळीच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा अध्याय आहे. या स्मारकाच्या माध्यमातून माता रमाई यांचा त्याग आणि त्यातून उभे राहिलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य याचे प्रभावी दर्शन नागरिकांना घडेल.

हा रमाई सृष्टीचा भव्य आणि दर्जेदार प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासोबतच प्रकल्पात कोणतीही कमतरता राहू दिली जाणार नाही."

माता रमाई स्मारक उभारणीमुळे शहराच्या सामाजिक व सांस्कृतिक ओळखीमध्ये भर पडणार असून, हे स्मारक भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल, असा विश्वास यावेळी बनसोडे यांनी व्यक्त केला.

सदर पाहणीवेळी संबंधित अधिकाऱ्यांनी स्मारकाच्या नियोजित आराखड्याची माहिती सादर केली.

स्मारकाचे काम नियोजनबद्ध आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना अण्णा बनसोडे यांनी दिल्या.

# गानसम्राज्ञी आशा भोसले यांना स्वरांजली

## पिंपरी चिंचवडमध्ये 'सूर आशा' सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी चिंचवड : भारतीय संगीत क्षेत्रातील देदीप्यमान नक्षत्र आणि गानसम्राज्ञी आशा भोसले यांच्या जादुई स्वरांना मानवंदना देण्यासाठी पिंपरी चिंचवडमध्ये 'सूर आशा - A Tribute to Asha Bhosle' या विशेष सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

**या कार्यक्रमाद्वारे आशा भोसले यांना सांगीतिक श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. गुरुवार, दि. 30 एप्रिल 2026 रोजी सायंकाळी 5 ते 8 या वेळेत चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात ही स्वरांजली संपन्न होणार आहे.**



हा कार्यक्रम मोरया थियएर्स निर्मित असून नियोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड शाखा, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान, सिद्धिविनायक ग्रुप आणि कोहिनूर ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे. या कार्यक्रमास पिंपरी चिंचवडचे महापौर रवी लांडगे आणि महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या कार्यक्रमाची संकल्पना आणि प्रस्तुती अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद (मध्यवर्ती) चे उपाध्यक्ष तथा पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर. व अ.भा. मराठी नाट्य परिषदेचे (पिं. चिं. शाखा) कार्याध्यक्ष राजेशकुमार सांकला आणि उपाध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांची आहे.

आशाजींच्या अजरामर गीतांचा वारसा सांगणाऱ्या या कार्यक्रमास कोमल कृष्णा, राधिका अत्रे, मानसी भोईर घुले, हिम्मत कुमार पंड्या आणि प्रशांत साळवी हे नामवंत गायक आपली कला सादर करतील. त्यांना चिंतन मोडा, हार्दिक रावल, विजू मूर्ती, सईद खान, असिफ खान आणि अभिजित भिडे यांसारख्या अनुभवी वादयवृंदांची साथ लाभणार आहे.

डॉ. अमित त्रिभुवन या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार असून, तांत्रिक बाजूंची धुरा 'म्युझिक व्हिजन', 'विजय चेव्रूर' आणि 'विक्रम क्रिएशन' सांभाळणार आहेत.

हा कार्यक्रम रसिकांसाठी पूर्णतः विनामूल्य असून, प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल.

कार्यक्रमाच्या विनामूल्य प्रवेशिका मिळवण्यासाठी इच्छुकांनी राजू बंग (9822313066) किंवा प्रशांत साळवी (7875458555) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन संयोजक भाऊसाहेब भोईर व सहकाऱ्यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन द्यावे-कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : एल-निनोच्या पार्श्वभूमीवर यावर्षी सरासरीपेक्षा कमी पर्जन्यमान होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन द्यावे. दुबार पेरणीची वेळ आल्यास शेतकऱ्यांना बियाण्यांची टंचाई भासणार नाही, याद्दष्टीने मुबलक प्रमाणात बियाण्यांची साठवूक करावी, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले. सर्व बियाणे उत्पादक, वितरक, विक्रेत्यांनी समन्वयाने कामे करावे, या उद्देशाने राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे, असेही ते म्हणाले.**




शिरनामे सभागृह, कृषी महाविद्यालय येथे आयोजित बियाणे उत्पादक कंपनी, वितरक आणि विक्रेत्यांची खरीप हंगामपूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महासंचालक राहूल माहिवाल, राष्ट्रीय सूचना केंद्राचे वरिष्ठ संचालक अविनाश पेडगावकर, संचालक विस्तार व प्रशिक्षण रफीक नाईकवाडी, संचालक निविष्ठा व गुणनियंत्रण सुनील बोरकर, महाराष्ट्र राज्य बीज प्रमाणीकरण यंत्रणेचे संचालक अंबादास मिसाळ, कृषी उपसंचालक बियाणे व नोडल अधिकारी साथी डॉ. प्रिती सवाईराम, यांच्यासह सियाम, मासा व माफदा बियाणे उत्पादक, विक्रेते संघटनेचे प्रतिनिधी, बियाणे उत्पादक, वितरक आणि विक्रेते उपस्थित होते.

ॲड. जयस्वाल म्हणाले, महाराष्ट्र राज्याने देशाला दिशा देण्याचे काम केले आहे. त्यामुळे सर्वांनी मिळून विकसित महाराष्ट्र 2047 च्या संकल्पपूर्तीच्याद्दष्टीने काम करावे. बोगस बियाण्यांवर आळा घालून शेतकऱ्यांना उच्चप्रतीचे बियाणे उपलब्ध करुन देण्याकरिता साथी पोर्टलचा वापर करावा, असे ॲड. जयस्वाल म्हणाले.

श्री. मांढरे म्हणाले, उच्च उत्पादनक्षम वाणांचा वापर, आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे देशाच्या बियाणे उत्पादनामध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. याकरिता साथी पोर्टल हे महत्वपूर्ण पाऊल असून यामुळे उत्पादक व विक्रेत्यांना कायदेशीर अडचणीच्यावेळी पुरावा म्हणून ते उपयोगी पडणार आहे. तंत्रज्ञानाचा प्रभावीपणे वापर करण्यावर भर द्यावा, असेही श्री. मांढरे म्हणाले.

श्री. बोरकर प्रास्ताविकात म्हणाले, केवळ उच्चतम प्रतीच्या बियाण्यांमुळे पीक उत्पादनात 20 टक्के पर्यंत वाढ होऊ शकते. शेतकऱ्यांना उच्च प्रतीचे व दर्जेदार बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाने साथी पोर्टल विकसित केले आहे. या पोर्टलची अंमलबजावणी खरीप हंगाम 2023 पासून करण्यात आली आहे.

बियाणे उत्पादक व विक्रेत्यांच्या संघटनेच्या सूचनेनुसार पोर्टलमध्ये आवश्यतेप्रमाणे बदल करण्यात आले असून पोर्टलच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र देशात अग्रेसर आहे, असेही श्री. बोरकर म्हणाले.

यावेळी डॉ. प्रिती सवाईराम यांनी साथी पोर्टलची उद्दिष्टे, उपयोगिता, पोर्टलमध्ये उत्पादक, विक्रेत्यांसाठी उपलब्ध असलेल्या सुविधा आदीबाबत मार्गदर्शन केले.

श्री .पेडगावकर यांनी पोर्टलचा वापर करतांना येणाऱ्या तांत्रिक अडचणीचे निराकरण करण्यात केले. तंत्र अधिकारी अनिल महामुलकर यांनी बियाणे कायद्यातील तरतुदी व बिटी कॉटन बाबत मार्गदर्शन केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते साथी पोर्टल मार्गदर्शक पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

# पुण्यात ड्रग्ज रॅकेटवर पोलिसांचा मोठा घाव! १९ आरोपी जेरबंद; ५८ लाखांचा मुद्देमाल जप्त








>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे शहरात अंमली पदार्थांच्या वाढत्या जाळ्यावर पोलिसांनी मोठा घाव घालत तब्बल 19 आरोपींना जेरबंद केले असून 58 लाख 18 हजार 250 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**शहर पोलिसांनी राबवलेल्या विशेष मोहिमेत मेफेड्रॉन (एम.डी.) आणि गांजा विक्री करणाऱ्या टोळ्यांचा पर्दाफाश झाला आहे.**

मा. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार परिमंडळ 7 अंतर्गत 1 एप्रिल ते 23 एप्रिल 2026 या कालावधीत अंमली पदार्थांविरोधात विशेष मोहीम हाती घेण्यात आली होती. या मोहिमेदरम्यान वाघोली, लोणीकंद, लोहगाव विमानतळ, चंदननगर आणि खराडी परिसरात पोलिसांनी सापळे रचत धडक कारवाया केल्या. या कारवाईत एम.डी. आणि गांजाची विक्री तसेच सेवन करणाऱ्यांविरोधात एनडीपीएस कायद्यान्वये 13 गुन्हे दाखल करण्यात आले असून 13 आरोपींना सुरुवातीला अटक करण्यात आली.

अटक आरोपींकडून चौकशीदरम्यान मेफेड्रॉनचा पुरवठा राजस्थानमधून होत असल्याची धक्कादायक माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने विशेष पथक राजस्थानला रवाना

केले. तेथे छापेमारी करत आणखी 6 पुरवठादार आरोपींना ताब्यात घेण्यात आले. त्यामुळे एकूण अटक आरोपींची संख्या 19 वर पोहोचली.

या संपूर्ण कारवाईत पोलिसांनी खालील अंमली पदार्थ जप्त केले आहेत :

289.19 ग्रॅम मेफेड्रॉन (एम.डी.)

422 ग्रॅम गांजा

260 ग्रॅम संशयित पावडर (एम.डी.चा अंश असलेली)

यासह रोख रक्कम व इतर साहित्य असा एकूण 58 लाखांहून अधिक मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

ही कारवाई रंजनकुमार शर्मा, मनोज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. दरम्यान, नागरिकांनी आपल्या परिसरात ड्रग्ज विक्री किंवा सेवन सुरु असल्यास तात्काळ जवळच्या पोलीस ठाण्याशी किंवा टोल फ्री क्रमांक 112 वर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

परिमंडळ 7 मध्ये यापुढेही ड्रग्ज माफियांविरोधात कठोर आणि सातत्यपूर्ण कारवाई सुरु राहणार, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# मशरूम युनिटमधील ड्रेनेज टँक ठरला मृत्यूचा सापळा तिघा परप्रांतीय कामगारांचा गुदमरून मृत्यू

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यात रविवारी दुपारी हृदयद्रावक दुर्घटना घडली. बेलसर येथील मशरुम उत्पादन युनिटमधील ड्रेनेज टँकमध्ये उतरलेल्या तिघा परप्रांतीय कामगारांचा गुदमरुन मृत्यू झाला.**



या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून मृतांच्या कुटुंबांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, युनिटमधील ड्रेनेज लाईन साफ करण्याचे काम सुरु होते. यावेळी एका कामगाराने टँकमध्ये प्रवेश केला. मात्र बराच वेळ होऊनही तो बाहेर न आल्याने इतर कामगारांनी चिंता व्यक्त केली.

सहकाऱ्याला मदत करण्याच्या हेतूने दुसरा कामगार टँकमध्ये उतरला. त्यानंतर काही क्षणांत तिसऱ्यानेही आत प्रवेश केला. मात्र तिघेही बाहेर न आल्याने एकच खळबळ उडाली.

घटनास्थळी उपस्थित नागरिक आणि कामगारांनी तत्काळ मदतकार्य सुरु केले. जेसीबीच्या सहाय्याने ड्रेनेज टँकचा स्लॅब फोडून तिघांना बाहेर काढण्यात आले. त्यानंतर त्यांना तातडीने जेजुरी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती तिघांनाही मृत घोषित केले.

प्राथमिक तपासात टँकमध्ये साचलेल्या विषारी वायूमुळे तिघांचा गुदमरुन मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. सुरक्षा साधनांचा अभाव आणि निष्काळजीपणा यामुळे ही दुर्घटना घडल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

मृतांची ओळख पिंटू राजेश प्रसाद (वय 23), व्यास सोहम कुमार (वय 22) आणि गौतम रामसुरन कुशवाहा (वय 36) अशी झाली असून तिघेही उत्तर प्रदेशातल Deoria जिल्ह्यातील रहिवासी होते.

या प्रकरणी संबंधित यंत्रणेच्या सुरक्षेच्या नियमांचे पालन झाले होते का, याबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 28/04/2026

e Paper

पिंपरी चिंचवड | पुणे

# देवगिरी निवासस्थानी पवार कुटुंबीयांची भेट

## विधान परिषदेसाठी योगेश बहल यांना संधी देण्याची मागणी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड : शहर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मुंबई येथील देवगिरी निवासस्थान येथे पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा तथा राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राज्यसभा खासदार पार्थ पवार यांची भेट घेतली. या भेटीत आगामी विधान परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहराला प्रतिनिधित्व मिळावे, यासाठी एकमताने शहराध्यक्ष तथा माजी महापौर योगेश बहल यांचे नाव पुढे करण्यात आले. यासंदर्भात शिष्टमंडळाने सविस्तर निवेदन सादर केले.**



निवेदनात म्हटले आहे की, योगेश बहल यांनी 1992 पासून सात वेळा निवडून येत शहरात एक अभ्यासू आणि कार्यक्षम लोकप्रतिनिधी म्हणून ओळख निर्माण केली आहे. त्यांनी महापौर, सभागृह नेते, स्थायी समिती अध्यक्ष तसेच शहराध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. शहरातील सामान्य नागरिकांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले असून पक्ष संघटना बळकट करण्यातही मोलाचे योगदान दिले आहे. तसेच, पिंपरी-चिंचवड शहराला आजतागायत विधान परिषदेमध्ये प्रतिनिधित्व मिळालेले नाही. पिंपरी विधानसभा मतदारसंघ अनेक वर्षांपासून आरक्षित असल्यामुळे बहल यांना संधी मिळू शकलेली नाही.

त्यामुळे त्यांच्या दीर्घ राजकीय कारकिर्दीचा विचार करुन विधान परिषदेच्या माध्यमातून त्यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली. निवेदनात पुढे नमूद करण्यात आले की, शहरात तीन विधानसभा मतदारसंघ असून त्यापैकी केवळ एकच आमदार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा आहे.

शहरातील विकासकामांना गती देण्यासाठी आणि प्रशासनाशी समन्वय साधण्यासाठी विधान परिषदेतून शहराला प्रतिनिधित्व मिळणे गरजेचे आहे. योगेश बहल यांना संधी दिल्यास शहराच्या विकासाला चालना मिळेल आणि पक्ष संघटनाही अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. औद्योगिक नगरी आणि आयटी हब म्हणून ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडसारख्या कॉस्मोपॉलिटन शहरात बहल यांसारख्या अनुभवी व अल्पसंख्याक समाजातील नेत्याला संधी दिल्यास सकारात्मक संदेश जाईल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या शिष्टमंडळात डॉ. वैशाली घोडेकर, हिरानंद (डब्बू) आसवाणी, पंडित गवळी, शाम लांडे, सीमा सावळे, वैशाली काळभोर, अतुल शितोळे, जितेंद्र ननावरे, फजल शेख, संतोष बारणे, राजेंद्र जगताप, प्रकाश सोमवंशी, निकिता कदम, विकास साने, राजू बनसोडे, शेखर चिंचवडे, वर्षा जगताप, मनिषा लांडे, उज्वला ढोरे, प्रियंका कुदळे, अरुणा लंगोटे, अश्विनी वाबळे, सारिका मासुळकर, प्रतिक्षा जवळकर-लांघी, दिप्ती कांबळे, ज्ञानेश्वर कांबळे, सारंग कामतेकर, तानाजी खाडे, ज्ञानेश्वर (माऊली) मोरे, रविंद्र ओव्हाळ, युसूफ कुरेशी, दिपक साकोरे, राजू लोखंडे, निलेश शिंदे, अंबरनाथ कांबळे, गणेश लंगोटे, मंगेश बारणे, हबीब शेख, सचिन बारणे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, या मागणीवर पक्ष नेतृत्व काय निर्णय घेते, याकडे पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# पवना धरणातून गाळ काढण्यास प्रारंभ

## खासदार श्रीरंग बारणे यांचा पुढाकार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी - पिंपरी-चिंचवडकरांची तहान भागविणाऱ्या मावळातील पवना धरणातील पाणीसाठ्यात वाढ होण्याच्या उद्देशाने धरणातून गाळ काढण्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सलग दहाव्या वर्षी धरणातून गाळ काढण्यात येत असून, त्यासाठी खासदार श्रीरंग बारणे यांनी पुढाकार घेतला आहे. शासनाचा कोणताही निधी न घेता लोकसहभागातून गाळ काढला जात आहे. गाळ काढल्याने धरणातील साठवण क्षमतेत वाढ झाली असून उन्हाळ्यात पाण्याची तीव्र टंचाई जाणवत नाही.**



पवना धरणातून गाळ काढण्याच्या कामाला रविवारपासून प्रारंभ करण्यात आला. यावेळी विधिवत पूजन करुन मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्या हस्ते या उपक्रमाची सुरुवात झाली. खासदार बारणे यांनी गेल्या 10 वर्षांपासून शासनाची कोणतीही आर्थिक मदत न घेता लोकसहभागातून हे गाळ काढण्याचे काम सातत्याने सुरु ठेवले आहे. यामुळे धरणातील पाणीसाठा वाढण्यास मदत होत असून, परिसरातील जलसंधारणाला बळ मिळत आहे. यंदाही पवना धरणातील जास्तीत जास्त गाळ काढून पाणीसाठ्यात वाढ करण्याचा उद्देश ठेवण्यात आला आहे. यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, मावळ तालुका प्रमुख राम सावंत, उपतालुका प्रमुख अमित कुंभार, सोमनाथ कोंडे, मदनभाऊ शेडगे, युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, उपजिल्हा प्रमुख दत्ताभाऊ केदारी, कामशेत शहर प्रमुख सतीश इंगवले, भगवान मिकोले, माजी सरपंच लाला गोंते, माजी उपसरपंच काळूभाऊ उंबरकर, अक्षय उंबरकर, भगवान दरेकर, बाळासाहेब दरेकर, एकनाथ दरेकर, अमित मोरे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या 50 वर्षांपासून पवना धरणातील गाळ काढला जात नव्हता. त्यामुळे पाणी साठण्यास अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे गेल्या नऊ वर्षांपासून धरणातील गाळ काढण्यास सुरुवात केली. परिणामी, धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे नागरिकांना पाणीटंचाईला सामोरे जाऊ लागले नाही. उन्हाळ्यात देखील पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध होत असल्याचे खासदार बारणे यांनी सांगितले. पावसाळा सुरु होईपर्यंत गाळ काढण्याचे काम चालू राहणार आहे.

खासदार बारणे म्हणाले, पवना धरणातून पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा होतो. या धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साठला जातो. त्यामुळे पाणीसाठ्यात अडथळा निर्माण होतो. परिणामी पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जाण्याची वेळ येते. धरणातून गाळ काढण्याला सुरुवात करण्यापूर्वी पिंपरी-चिंचवड शहराला दोन दिवसाआड पाणी मिळत होते. पाण्याची मोठी टंचाई जाणवत होती.

त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून दरवर्षी उन्हाळ्यात धरणातील गाळ काढण्यात येत आहे. आत्तापर्यंत 85 हजार क्युबिक मीटर गाळ धरणातून काढला आहे. त्यामुळे धरणातील पाणीसाठ्यात वाढ झाली आहे. त्यामुळे उन्हाळ्यातही तीव्र पाणीटंचाई जाणवत नाही.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968